## सुपारी

*Areca catechu* L.                Family – Arecaceae

**विविध भाषांमधील नावे:**

English: Areca palm, Betel nut palm, हिंदी:  सुपारी, कन्नड: अडिके मारा, तामिळ: पक्कु, संस्कृत: पुगा, मराठी: सुपारी, मल्याळम: आडाक्का, चेंपालउक्का, तेलगू: वाक्का



**वनस्पतीचे वर्णन:**

सुपारीचा वृक्ष किंवा पोफळी हा मलेशियाचा रहिवाशी असून त्याचा विस्तार ब्रिटीश राजवट किंवा त्या काळाच्या अगोदरच्या काळात झाल्याचे मानले जाते. पोफळीची झाडे शेलाटी आणि सरळसोट असून त्यांची उंची २० ते ३० फूट इतकी असते.खोडाचा रंग प्राथमिक अवस्थेत हिरवा असतो नंतर तो भुरकट राखाडी असतो.खोडाची रुंदी १ फूट असते. वाळलेल्या पानाच्या खोडावरील खुणा 'पेर' म्हणून ओळखल्या जातात. ही पेरे वर्तुळाकार आणि थोडी उंचावलेली असतात. पिसाच्या आकाराच्या कोवळ्या पानांच्या खालच्या बाजूला सोपटाच्या खालच्या भागातून हा फुलोरा उगवतो. फुलोरा नारळाच्या फुलोऱ्याप्रमाणेच असतो. त्याला अनेक शाखा असतात. या शाखांवर मांसल दांड्यात रुतलेली मादी फुले असतात आणि वरच्या भागात नर फुले असतात. पक्व फळे २-३ दुय्यम घडांत विभागलेली असतात. संपूर्ण घडात जवळपास २५० फळे असतात. फळात एकच बी तयार होते. बी कठीण असून त्याच्या अंतर्भागात पांढऱ्या शिरा पसरलेल्या असतात.



**बहर येण्याचा कालावधी-** डिसेंबर ते फेब्रुवारीमध्ये

**औषधी उपयोग–**

सुपारी हा विड्याचे पानात टाकावयाचा एक पदार्थ. सुपारी भोजनानंतर तशीच फोडूनही खातात. सुपारी कातरण्यासाठी अडकित्ता वापरला जातो. फळे धरण्याचा काळ १५ ते ४० वर्षांचा असतो. दर दहा वर्षांनी झाडाची उपज करून वृद्ध झालेल्या झाडाची कमतरता भरून काढावी लागते.त्यामुळेच सुपारीच्या बागेत झाडांची गर्दी झाल्यासारखी दिसून येते. समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशात संपूर्ण कोकणच्या किनाऱ्यावर सुपारीच्या विपुल बागा आढळतात. केरळमध्ये कालिकत येथे भारत सरकारने यावरील संशोधनासाठी विशेष केंद्रे उभारली आहेत. सुपारीत भरपूर प्रमाणात टॅनिन असल्यामुळे कित्येक ठिकाणी त्याचा वापर कापसाचे कपडे रंगविण्यासाठी केला जातो. नाजूक खोड सुंदर हिरवीगार पाने आणि फळे धरल्यावर दिसणारे सुफळ संपूर्ण सौंदर्य यामुळे हे नाजुकसे झाड मुंबईत सुपारीच्या लोभापेक्षा शोभेसाठीच जास्त लावले जाते.

**लागवड-** बियांपासून रोपांची लागवड केली जाते.